## श्री.किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय,

## कारंजा (लाड), जि.वाशिम.

### (वाणिज्य विभाग)

### वार्षिक अहवाल (२०१७—२०१८)

सत्र २०१७—२०१८मध्ये वाणिज्य सत्र — १ला वाणिज्य शाखेत ११८ विद्यार्थ्यांना प्रवेश समिती समन्वयक डॉ.दिनेश रघुवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात आला. तसेच बि.कॉम.भाग.२ मध्ये ९० विद्यार्थी आणि बि.कॉम.भाग ३ मध्ये ८४ अशा एकूण २९२ विद्यार्थीनी वाणिज्य शाखेत पदवीस्तरावर प्रवेश घेतला.

वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश रघुवंशी व सहाय्यक प्राध्यापक श्री घननिळ गजभिये,व डॉ. बलजित कौर ओबेरॉय यांच्या मार्गदर्शनाखाली सत्र २०१७ —२०१८चे वाणिज्य विभागासाठी वार्षिक नियोजन करण्यात आले. त्यामध्ये वाणिज्य अभ्यास मंडळाची स्थापना, बॅक व्हिजीट, वाणिज्य 'अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन', शैक्षणिक व औद्योगिक सहलीचे आयोजन, घटक चाचणी परिक्षा, असाईन्मेंट व संगणक प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादीचे आयोजन करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

सत्र २०१७—२०१८पासुन बी.कॉम.भाग—१ च्या विद्यार्थ्यांना सत्रीय अभ्यासक्रम लागु झाल्यामुळे त्यांना अभ्यासक्रमाचे विषय, अभ्यासक्रम, परिक्षा पध्दती, क्रेडीट आणि ग्रेड पध्दती या सबंधीची माहीती देण्यात आली.

दिनांक २९/०८/२०१७ रोजी विभाग प्रमुख डॉ. दिनेश रघुवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली २०१७—२०१८या शैक्षणिक वर्षाकरिता वाणिज्य अभ्यास मंडळाचे गठण करण्यात आले. वाणिज्य अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष—कु. निखीता बेद्रे (भाग३), उपाध्यक्ष—अहमद अलि शहा (भाग३), सचिव—सौरभ देशमुख (भाग—२), सहसचिव—कु.हेमलता आर. तिडके (भाग—२), सदस्य—सागर चक्रधर, रोहित एक्कलवार, अ.ज.सुरजुसे, कु. ममता उगले, कु.श्वेता गडे (भाग—१), यांची नियुक्ती करण्यात आली.

दिनांक २२ व २३ सप्टेंबर २०१७ या कालावधीत बंगलोर येथील नॅक Peer Team ने महाविद्यालयाला भेट दिली. त्या संदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विनय कोडापे व डॉ.मेघनाथ भावे यांच्या मार्गदर्शनाखाली कामाचे नियोजन करून संपुर्ण तयारी करून घेतली. संबंधीत टिमने वाणिज्य

विभागाला भेट दिली आणि विभागप्रमुख यांच्यासोबत चर्चा करून विषयाचे सादरीकरण करण्यात आले.

दिनांक १४/११/२०१७ रोजी अभ्यास मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले. या कार्यक्रमाला उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक ॲड. दिगांबर पिंजरकर (माजी विद्यार्थी) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. दिनेश रघुवंशी, श्री. घननिळ गजभिये, डॉ. बलजित कौर ओबेरॉय, उपस्थित होते. तसेच वाणिज्य अभ्यास मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि बहुसंख्येने वाणिज्य शाखेचे विर्द्याथी उपस्थित होते.

दिनांक ०५/१०/२०१७ या कालावधीत बी.कॉम.भाग–१ प्रथम सेमिस्टरच्या विद्यार्थ्याचे संबंधीत विषयाचे Assignment घेण्यात आले.

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी वाणिज्य विभागा तर्फे Financial Education and awareness workshop घेण्यात आला. या कार्यशाळेला डॉ.प्रशांत पिसोळकर यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक ०८/१२/२०१७ रोजी वाणिज्य फोरम तर्फे बुटीबोरी नागपुर येथील ‘‘Indoworth India Limited’’ या उद्योगाला औद्योगिक भेट देण्यात आली. या उद्योगामध्ये विद्यार्थ्यांना अत्याधुनिक मशीन द्वारे कापसापासुन सुत तयार करण्याची प्रक्रिया, त्यांची बाजारपेठेत विक्री, विपणन, संग्रहन, तसेच मालाची निर्यात या बाबतची विविध माहिती उद्योगाचे जनसंपर्क अधिकारी श्री.गायकवाड यांनी दिली. तसेच GST चा उद्योगावर होणार परिणाम यावरही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

दिनांक २० जानेवारी २०१८ रोजी Motivation या विषयावर प्राचार्य डॉ.अरविंद शेंडे, श्रीमती कमलानेहरू महिला महाविद्यालय नागपुर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक २३ जानेवारी २०१८ रोजी **‘‘भारतीय संस्कृती संवर्धनामध्ये स्त्रियांचे योगदान’’** या विषयावर एक दिवशीय विद्यापिठस्तरीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या अध्यक्षपदी,दि.बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.डॉ.आर.बी.हेडा तर उद्घाटक म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ अमरावतीचे मा. कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर उपस्थित होते.

दिनांक १४/०२/२०१८रोजी वाणिज्य भाग ३ च्या विद्यार्थ्यांना करिता निरोप समारंभ (Farewell) आयोजित करण्यात आला होता. या मध्ये वाणिज्य विभागातील ४१विद्यार्थी सहभागी झाले होते.

**विभाग प्रमुख**

**(डॉ.दिनेश रघुवंशी)**

# Photos of Programme








# News of Programme

सकाळ
वाशीम, गुरुवार
७ सप्टेंबर २०१७
३

## कि. न. गो. महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागात कार्यशाळा

**कारंजा, ता. ६ :** किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालयात कार्यकारी प्राचार्य डॉ. विनय कोडापे यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य विभागात डॉ. प्रशांत पिसोळकर यांचे आर्थिक शिक्षण व जागृती या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला वाणिज्य विभागप्रमुख डॉ. दिनेश रघुवंशी, प्रा. घननीळ गजभिये, डॉ. बलजित कौर ओबेरॉय, प्रा. सुधा चौबे, वाणिज्य फोरम च्या अध्यक्षा निकिता बेदरे व वाणिज्य फोरमच्या सर्व पदाधिका-यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम पुष्पगुच्छ देऊन कार्यकारी प्राचार्य डॉ. विनय कोडापे यांचे स्वागत डॉ. दिनेश रघुवंशी यांनी केले. तसेच डॉ. प्रशांत पिसोळकर यांचे स्वागत कार्यकारी प्राचार्य डॉ. विनय कोडापे यांनी केले. डॉ. दिनेश रघुवंशी यांचे स्वागत अभिजित देशमुख यांनी केले. डॉ. प्रशांत पिसोळकर हे शंकरलालजी खंडेलवाल महाविद्यालय, अकोला



**कारंजा : गोयनका महाविद्यालयातील कार्यशाळेत बोलताना मान्यवर.**

येथे वाणिज्य विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहे. संचालन रेणुका बेदरे, प्रास्ताविक डॉ. दिनेश रघुवंशी व आभार सागर हिंरे यांनी मानले.

लोकमत

## वेळेची किंमत ओळखून आर्थिक निर्णय घ्या - पिसोळकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कारंजा :** किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालयात कार्यकारी प्राचार्य डॉ.विनय कोडापे यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य विभागात डॉ.प्रशांत पिसोळकर यांचे आर्थिक शिक्षण व जागृती या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. होते.

कार्यक्रमाला वाणिज्य विभागप्रमुख डॉ.दिनेश रघुवंशी, प्रा.घननीळ गजभिये, डॉ.बलजित कौर ओबेरॉय, प्रा.सुधा चौबे, वाणिज्य फोरमच्या अध्यक्षा निकिता बेदरे व वाणिज्य फोरमच्या सर्व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. डॉ.प्रशांत पिसोळकर यांनी आपल्या व्याख्यानात विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक करण्यासंबंधी अतिशय उपयुक्त असे मार्गदर्शन केले. वेळेची किंमत ओळखून आर्थिक निर्णय घेणे गरजेचे आहे. आर्थिक घडामोडीसंबंधी ज्ञान प्रत्येक विद्यार्थ्यांना असणे गरजेचे आहे, असे त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले. गुंतवणुकीसाठी उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या योजना त्यांनी या कार्यशाळेत विशद केल्या. वित्तीय शिक्षणाचे ज्ञान प्रत्येक वाणिज्यच्या विद्यार्थ्याला असणे गरजेचे आहे, ही त्यांनी आपल्या कार्यशाळेत नमूद केले.डॉ.प्रशांत पिसोळकर हे शंकरलालजी खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथे वाणिज्य विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहे तसेच भारतीय रोखे आणि विनिमय बोर्ड या संस्थेचे ते फायनान्शियल रिसोर्स पर्सन म्हणून अमरावती विभाग अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी वर्ग व शिक्षकांना आर्थिक साक्षरता या विषयावर उपयुक्त अशी माहिती देत आहेत.

अध्यक्षीय भाषणात डॉ.विनय कोडापे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात असलेल्या साधनांचा महत्तम उपयोग करुन महाविद्यालयाला नावलौकिक मिळवून देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन रेणुका बेदरे, प्रास्तविक डॉ.दिनेश रघुवंशी व आभार सागर हिरे यांनी मानले.

**Photos of Programme & News**
**(Department of Commerce)**




